# सिंधुदुर्ग पोलीसांची धडक कारवाई- निरुखे, ता.कुडाळ येथील दरोडयाच्या गुन्हयातील मुख्य सुत्रधार अटक

कुडाळ पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं.१३४/२०१८, भा.द.वि.क.३९५,४१७,१७०,१२० (ब) या गुन्हयातील फिर्यादी रामदास पुरुषोत्तम करंदीकर, यांचे घरात दि.२२/०४/२०१८ रोजी २०.४५ वा. सीआयडीचे ऑफिसर व स्टाफ असल्याची बतावणी करुन अज्ञात आरोपीत यांनी अवैध मालमत्तेचा शोध घेण्याकामी घरात घुसुन घरातील ५ ते ५.५ लाख रुपये कोणतीही कारवाई न करता लुटुन घेऊन गेले. सदरबाबत रामदास करंदीकर यांचे फिर्यादीवरुन दि.१२/०५/२०१८ रोजी ००.१९ वा. गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्हयातील काही आरोपी यापुर्वी अटक करण्यात आले होते. परंतु गुन्हयातील मुख्य सुत्रधार श्रीजीत रमेशन, रा.देहु रोड, पुणे तसेच इरफान निजामुददीन शेख, रा.पुणे व इतर आरोपी हे फरारी होते. सदर आरोपींचा मा.सत्र न्यायालय ओरोस, मा.हायकोर्ट मुबंई यांचे न्यायालयात व सुप्रीम कोर्टातसुदधा अटकपुर्व जामिन मिळणेकामी अर्ज सादर केलेला होता. परंतु मा.सत्र न्यायालय ओरोस, मा.हायकोर्ट मुबंई तसेच, सुप्रीम कोर्टानेसुदधा यांचा जामिन रदद केलेला आहे. वरील आरोपीत हे गुन्हा केल्यापासुन फरारी होते. सदर गुन्हयाचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी, सावंतवाडी श्री.मुळीक हे करीत होते.

मा.श्री.दीक्षीत गेडाम,पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग तसेच मा.श्री.तुषार पाटील, अपर पोलीस अधीक्षक,सिंधुदुर्ग यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी, सावंतवाडी श्री.मुळीक यांनी व त्यांचे पथकाने नमुद आरोपींचा शोध घेणेकामी वेगवेगळी पथके स्थापन करुन जिल्हयात तसेच जिल्हयाबाहेर शोध घेतला तसेच त्यांची गोपनीय माहिती काढुन सदर आरोपीत यांना श्री.मुळीक उपविभागीय पोलीस अधिकारी सावंतवाडी, सपोनि हुलावळे, पोह पडकील, पोह दुधवडकर, पोशि शिंदे यांनी ताब्यात घेतले आहे. आरोपीत यांना मा.न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने त्यांना ५ दिवसाची पोलीस कस्टडी दिलेली आहे.